# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांक:29.04.2026 वारः बुधवार

---

1. पश्चिम बंगाल मध्ये आज विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि अंतिम टप्प्यासाठी मतदान
2. शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत दुर्बल घटकतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणं ही राष्ट्रीय चळवळ असल्याचं सर्वोच्च न्यायालयाच मत
3. 25 एप्रिल रोजी देशात उन्हाळ्याच्या या हंगामातील सर्वोच्च अर्थात 256 गिगा वॅटपेक्षा अधिक वीजेची मागणी पूर्ण करण्यात सरकारला यश आणि
4. जागतिक तेल उत्पादक देशांची संघटना असणाऱ्या ओपेकमधून बाहेर पडण्याचा संयुक्त अरब अमिरातीचा निर्णय

**<u>मतदान</u>**

पश्चिम बंगाल मध्ये आज विधानसभा निवडणुकीच्या दुसया आणि अंतिम टप्प्यासाठी मतदान होत आहे. सात जिल्ह्यातील 142 जागांसाठी, 40 हजारांपेक्षा जास्त मतदान केंद्रांवर आज सकाळी 7 वाजल्यापासून मतदान सुरू झाल आहे. अनेक मतदान केंद्रावर आज सकाळपासूनच मतदारांच्या मोठ्या रांगा लागल्या आहेत. या दुसऱ्या टप्प्यात विविध पक्षांचे 1 हजार 448 उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्यामध्ये 2 शे 20 महिला उमेदवार आहेत. या टप्प्यात 3 कोटी 20 लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पडावी यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून मतदान केंद्रावर वेब कास्टिंगची सुविधा ही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगाल मधील नागरिकांना आज भरगोस मतदान करून लोकशाही जास्त सक्षम करण्याच आवाहन केल आहे. या संदर्भात पंतप्रधानांनी समाजमाध्यमावर प्रसिद्ध केलेल्या संदेशात म्हंटल आहे की पश्चिम बंगालमधील महिला आणि युवा पिढीने या मतदानात मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन आतापर्यंतचा सर्वोच्च मतदानाचा विक्रम मोडावा

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी कालपासून दोन दिवसांच्या उत्तरप्रदेश दौऱ्यावर असून आज त्यांच्या हस्ते हरदोई इथल्या गंगा एक्सप्रेस या द्रुतगती महमार्गाच उद्धाटन होणार आहे. एकंदर 590 किलोमीटर लांबीचा आणि 6 मार्गिका असलेला हा अति द्रुत महामार्ग असून त्यासाठी सुमारे 36 हजार 2 शे 30 कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. या कार्यक्रमानंतर पंतप्रधान मोदी सार्वजनिक सभेत मार्गदर्शन करणार आहेत .

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा आज हिमाचल प्रदेशातील अटल सुरंग भेटीचा प्रस्तावित दौरा रद्द करण्यात आला आहे. राष्ट्रपती या दौऱ्यादरम्यान सीमा सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांशी ही संवाद साधणार होत्या. मात्र हिमाचल प्रदेशातील प्रतिकूल आणि सतत बदलत हवामान, वादळी वाऱ्यासह पाऊस आणि बर्फ वृष्टि होण्याचा हवामान खात्याचा अंदाज असल्याने हा दौरा रद्द करण्यात आला आहे .

**<u>शिक्षण हक्क-सर्वोच्च न्यायालय</u>**

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत दुर्बल घटकतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणं ही राष्ट्रीय चळवळ असल्याचं म्हणत सर्वोच्च न्यायालयानं याबाबतचा निर्णय कायम ठेवला आहे. राज्य सरकारच्या निर्देशांनुसार खाजगी अनुदानित शाळांसह परिसरातील सर्व शाळांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देणं कायद्यानं बंधनकारक असल्याचं न्यायालयानं नमूद केलं. समाजातील दुर्बल आणि वंचित वर्गातील मुलांना प्रवेश नाकारणं म्हणजे घटनेतील कलम 21 अ मधील शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचं उल्लंघन असल्याचं न्यायलयानं म्हटलं आहे.

लखनऊमधल्या एका खाजगी शाळेनं शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्रवेशासाठी निवड होऊनही एका विद्यार्थिनीला प्रवेश नाकारला होता. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायलयानं काल हा निर्णय दिला.

**<u>बौद्धिक संपदा-गोयल</u>**

देशातील बौद्धिक संपदा पूर्णत्वानं उपयोगात आणण्यासाठी नवोन्मेष आणि बौद्धिक संपदा यांच्या समन्वयातून काम झालं पाहिजे असं सांगून प्रत्येक नव्या कल्पनेचं रुपांतर सुरक्षित संपत्तीत करण्याचं आवाहन केंद्रिय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी केलं. जागतिक बौद्धिक संपदा दिनानिमित्त नवी दिल्लीत झालेल्या कार्यक्रमात ते काल बोलत होते. नवोन्मेषक, विद्यार्थी आणि संबंधितांनी आपल्या कल्पनांची

स्वामित्व हक्क, ट्रेडमार्क आणि अन्य बौद्धिक संपदा यंत्रणेअंतर्गत त्वरित नोंदणी करावी असं गोयल म्हणाले. क्रीडा क्षेत्राशी संबंधित बौद्धिक संपदा नोंदणीसाठीचं शुल्क तीन वर्षांसाठी माफ करण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. देशाच्या क्रीडा क्षेत्रातील नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

**वीजेची मागणी**

देशातल्या विविध भागात सध्या मोठ्या प्रमाणात उष्णतेचा प्रकोप पाहायला मिळत असून देशातील वीजेची मागणी सर्वोच्च पातळीवर पोहचली आहे. या पार्श्वभूमीवर, 25 एप्रिल रोजी देशात उन्हाळ्याच्या या हंगामातील सर्वोच्च अर्थात 256 गिगा वॅटपेक्षा अधिक वीजेची मागणी पूर्ण करण्यात सरकारला यश आल आहे. 2024 मध्ये मे महिन्यात आतापर्यन्तची सर्वोच्च वीजेची मागणी 250 गिगा वॅट नोंदवण्यात आली होती. हा विक्रम यावर्षी मोडला आहे.

याबाबत केंद्रीय वीज मंत्रालयाने माहिती दिली आहे. विशेष म्हणजे देशानंतर्गत ही विजेची सर्वोच्च मागणी पूर्ण करून केंद्र सरकारने शेजारील देशामध्ये विजेची मागणीनुसार निर्यात ही यशस्वीपणे पूर्ण केली आहे. देशात पारंपरिक वीज उत्पादनाच्या प्रकारा बरोबरच जलविद्युतप्रकल्प, अणुऊर्जा आणि नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प अश्या अनेक माध्यमातून हे विजेच सर्वोच्च उत्पादन यशस्वीपणे करण्यात आल्याच वीज मंत्रालयाने म्हंटल आहे.

**वैष्णव**

मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन, सेमी कंडक्टर उत्पादन, अत्याधुनिक चिप आरेखन आणि कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञान यासह देश वेगानं प्रगती करत आहे असं केंद्रिय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल सांगितलं. वैष्णव आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांच्या हस्ते विशाखापट्टणम इथं गुगल क्लाउड इंडिया एआय हबचं भूमीपूजन करण्यात आलं, त्यावेळी वैष्णव बोलत होते. जागतिक तंत्रज्ञान उद्योगांनी भारताकडे विश्वासार्ह उत्पादक, विकासक, रचनाकार आणि निर्मितीचं ठिकाण यादृष्टीने पाहावं असं आवाहन त्यांनी केलं. दक्षिण किनारपट्टी रेल्वे विभागाबाबतची अधिकृत सूचना येत्या 1 जून रोजी जारी केली जाईल असं वैष्णव यांनी जाहीर केलं.

**एनएचएआय**

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण म्हणजे एनएचएआयनं उष्णतेच्या लाटेपासून कामगारांचं संरक्षण करण्यासाठी आणि राष्ट्रीय महामार्गांवर सुरक्षित कामकाज सुनिश्चित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्व जारी केली आहेत. कंत्राटदारांना दुपारी 12 ते 4 या वेळेत काम टाळण्यास सांगितलं आहे, तसंच, डांबर टाकणे आणि वेल्डिंग यांसारखी जास्त श्रमाची कामं पहाटे किंवा संध्याकाळच्या वेळी करण्यात यावी असं सांगितलं आहे. नियमित विश्रांतीसाठी थांबे आणि योग्य विश्रांतीची व्यवस्था अनिवार्य करण्यात आली आहे. कामगारांना विश्रांतीसाठी सावलीची जागा, पिण्याचं स्वच्छ पाणी आणि ORS किंवा ग्लुकोजसह प्रथमोपचार देण्याचे निर्देशही दिले आहेत.

**बुद्ध अवशेष**

देशांतर्गत एक ऐतिहासिक पाऊल म्हणूंन भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष प्रथमच नागरिकांसाठी दर्शनासाठी ठेवण्यात येणार असून त्यासाठी आज केंद्रशासित प्रदेश लडाख इथ हे अवशेष आणण्यात येणार आहेत. हवाई दलाच्या एक विशेष विमानाद्वारे कडक सुरक्षा व्यवस्थेत हे अवशेष आज लडाख इथ आणण्यात येत असून विमानतळावर त्यांच स्वागत उपराज्यपाल विनय कुमार सकसेना हे करणार आहेत. भगवान बुद्धांचे हे पवित्र अवशेष कपिल वस्तू इथल्या पिपरहवा बौद्ध स्तूप इथले असून येत्या 1 ते 15 मे दरम्यान लडाख मधील विविध ठिकाणी ते दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहेत

**ओपेक**

तेल उत्पादक देशांच्या संघटना अर्थात ओपेक आणि विस्तारित ओपेक प्लस संघटनांमधून बाहेर पडण्याचा निर्णय संयुक्त अरब अमिरातीनं काल जाहीर केला. याची अंमलबजावणी 1 मे पासून केली जाणार असल्याची माहिती युएईच्या सरकारी वृत्तसंस्थेनं दिली. राष्ट्रीय हित, तेल उत्पादन क्षमता आणि दीर्घ कालीन आर्थिक प्राथमिकता याचा विचार करून हा निर्णय घेतला असल्याच यु ए ई ने म्हंटल आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार